www.itvishwa.com

# आय.टी. विश्व

# अॅडॉब पेजमेकर




किरण पाटील

आय.टी. विश्व

## P a g e m a k e r

### A. Introduction

या सॉफ्टवेअरचा पुढील विविध कामांसाठी उपयोग होतो.

पुस्तकांचे सेटींग करण्यासाठी, यांत कोठेही पेज ब्रेक न करता आपण सलग टाईप करु शकतो.
जाहिरातींचे सेटींग्ज तयार करण्यासाठी.
अनेक प्रकारच्या पॅकिंगच्या बॉक्सवर चिटकविण्यासाठीचे लेबल्स यात तयार करता येतात.
लग्न पत्रिका, आमंत्रण पत्रिका तसचे व्हिजीटींग कार्डस यात तयार करता येतात.

लेटरहेडस, पॉम्पलेटस नोट बुक्स तयार करण्यासाठी पेजमेकरचा वापर केला जातो.

### B. Screen of Pagemaker

पुढील प्रमाणे पेजमेकरची स्क्रीन दिसते.




**Set Point :-** ज्या ठिकाणी Horizantal व Vertical ruler lines एकत्र येतात, त्या पॉइंटला झीरो सेट पॉइंट असे म्हणतात. या पॉइंटपासुन आडवे व उभे अंतर मोजण्याची सुरवात होते. या पॉइंटला क्लिक करुन ड्रॅग केल्यास तो हलवता येतो.

**Page Icons :-** येथे फाईलमध्ये असलेली सर्व पाने दिसतात.

**Master Page :-** मास्टर पेज म्हणजे असे पेज ज्यावर केलेले टाईपींग किंवा फॉरमॅटींग हे पुढील प्रत्येक पानावर येते. एखादे मॅटर जर प्रत्येक पानावर हवा असेल, उदा. पेज नंबर, हेडिंग तर ते प्रत्येक पानावर टाईप करण्यापेक्षा ते या मास्टर पेजवर टाईप करावे, म्हणजे ते सर्व आपोआप पुढील पानंवर दिसेल. जर आपले पान Double sided तर L व R असे दोन मास्टर पेज मिळतात. पण जर Double sided नसेल तर फक्त R मास्टर पेज मिळते. Double sided option मधील left master वर केलेले टाईपिंग हे फक्त विषम संख्येच्या पानांवर (2,4,6,8) येईल, तर right master वर केलेले टाईपिंग किंवा फॉरमॅटींग हे फकत विषम संख्येच्या (1,3,5) पानंवर येईल.

## C. Hanger

यांचा पेजमेकरमध्ये सर्वात जास्त उपयोग होतो. हॅंगर म्हणजे दोन आडव्या लाईन्सचा बॉक्स, ज्यात अक्षरे टाईप केलेली असतात. जेव्हा आपण अक्षरे टाईप करायला सुरवात करतो तेव्हा हे हॅंगर्स आपोआप तयार होतात. मात्र टाईप करतांना हे हॅंगर्स दिसत नाहीत, तसेच प्रिटींगमध्येही येत नाहीत. हा हॅंगर बघायचा असेल तर टूल बॉक्स मधील ॲरो पॉइंटर सिलेक्ट करुन अक्षरांवर क्लिक करावे.




यांचा पेजमेकरमध्ये जास्त उपयोग होतो. हॅंगर म्हणजे दोन आडव्या लाईन्सचा बॉक्स होय. ज्यात अक्षरे टाईप केलेली असतात. जेव्हा आपण टाईप करायला सुरवात करतो तेव्हा हे हॅंगर्स आपोआ तयार होतात. मात्र टाईप करतांना हे हॅंगर्स दिसत नाहीत. हे हॅंगर्स बघण्यासाठी Arrow pointer सिलेक्ट करुन अक्षरांवर क्लिक करावे.

या हॅंगरच्या चारही बाजुला काळे लहान गोल आलेले असतात. यावर क्लिक करुन व माऊस ड्रॅग करुन हॅंगरची लांबी व रुंदी कमी, जास्त करता येते. हॅंगरची उंची जसजश्या लाईन्स वाढत जातील तसतशी वाढत राहते.

हॅंगरच्या वर आणि खाली हॅण्डल्स असतात. यांचा उपयोग हॅंगरची उंची कमी जास्त करण्यासाठी होतो. पण जर हॅण्डलची उंची खुप जास्त कमी केली तर खालील बाजुच्या हॅण्डलवर लाल रंगाचा एक बारीक बाण आलेला दिसतो. याचा अर्थ तया हॅंगरमधील बाकिचे अक्षरे दिसत नाहीत असा होतो.

हे हॅंगर एका ठिकाणाहून दुसरीकडे सहज हलवता येतात.

**D. Tool Box**

पेजमेकरमध्ये जर टूल बॉक्स दिसत नसेल तर Window मेनूमधून Show Tools या कमांडला क्लिक करावे. यात पुढील ऑप्शन असतात.




1) **Pointer Tool :-** ऑब्जेक्ट, इमेज तसेच हँगर सिलेक्ट करण्यासाठी, त्यांचा आकार बदलवण्यासाठी तसेच ते एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी हलवण्यासाठी या टूल्सचा वापर होतो. ऑब्जेक्टच्या आऊटलाईवर क्लिक केल्यास त्याच्या चारही बाजूला काळे लहान चौकोन आलेले असतात. त्यांना हॅण्डल असे म्हणतात. या हॅण्डलवर क्लिक करुन ड्रॅग केल्यास त्यांचा आकार बदलवता येतो आणि त्यांच्या आऊटलाईनवर क्लिक करुन ड्रॅग केल्यास ते एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हलवता येतात.

2) **Text Tool :-** अक्षरे टाईप करण्यासाठी आणि ते सिलेक्ट करण्यासाठी या टूलचा वापर होतो.

3) **Rotate Tool :-** सिलेक्ट केलेला ऑब्जेक्ट रोटेट करण्यासाठी या टूलचा वापर होतो. प्रथम ऑब्जेक्ट सिलेक्ट करावा. नंतर हा टूल सिलेक्ट करुन त्या ऑब्जेक्टच्या चारही बाजूला कोणत्याही हॅण्डलवर क्लिक करुन ड्रॅग



करावे. जर हे rotation काढावयाचे असेल तर Element मेनु मधील clear transformation या कमांडला क्लिक करावे.

**4) Crop Tool :-** पेजमेकरमध्ये एखादया ईमेजचा भाग कट करण्यासाठी हा टूल सिलेक्ट करुन त्या ईमेजच्या कोणत्याही हॅण्डलवर क्लिक करुन आतील बाजुला ड्रॅग करावे.

**5) Line Tool :-** या टूलने सरळ किंवा कोणत्याही कोनात लाईन काढता येते.

**6) Constrain Line Tool :-** या टूलच्या मदतीने 0,45,90,135,180,360 या कोनातच लाईन काढता येते.

**7) Rectangel Tool :-** चौकोन काढण्यासाठी हा टूल वापरतात.

**8) Rectangle Frame Tool :-** एखादया चौकोनात जर लिहावयाचे असेल तर हा टूल सिलेक्ट करुन एक चौकोन काढावा आणि त्यात टाईप करावे.

**9) Ellips Tool :-** गोलाकार आकार या टूलच्या मदतीने काढता येतो.

**10) Ellips Frame Tool :-** गोलाकार आकारात अक्षरे टाईप करण्यासाठी हा टूल वापरतात.

**11) Polygon Tool :-** पॉलीगॉन काढण्यासाठी हा टूल वापरतात. Element मेनु मधील Polygon Setting या कमांडमध्ये याविषयी अनेक ऑप्शन आहेत.

**12) Polygon Frame Tool :-** पॉलीगॉन मध्ये अक्षरे टाईप करण्यासाठी या टूलचा वापर होतो.

**13) Hand Tool :-** पेज खालीवर किंवा डाव्याउजव्या बाजुला सरकवीण्यासाठी हा टूल वापरतात. हा टूल सिलेक्ट केल्या माऊस पॉइंटरचा आकार तळहातासारखा होतो.

**14) Zoom Tool :-** पेज झुम करण्यासाठी या टूल ला सिलेक्ट करुन पेजवर क्लिक करावे. तसचे झुम आऊट करण्यासाठी किबोर्डवरील **ctrl** बटन प्रेस करुन पेजवर क्लिक करावे.

## E. Control Palette

हा बॉक्स तीन पकारे दिसतो. जर आपण टूल बॉक्स मधील T या बटनाला सिलेक्ट केले तर Character View मध्ये कंन्ट्रोल पॅलेट दिसतो. येथील ¶ या बटनाखालील C या बटनाला क्लिक केल्यास पॅराग्रॉफ व्हु दिसतो. तसेच जर ऑब्जेक्ट सिलेक्ट केला तर ऑब्जेक्ट व्हु दिसतो. येथुन सिलेक्ट केलेल्या मॅटर किंवा ऑब्जेक्टच्या प्रॉप्रर्टी बदलवून Apply या बटनाला क्लिक केल्यास त्या प्राप्रर्टी लागू होतात.

**<u>a) Character View :-</u>** येथे अक्षरांसाठी सर्व सेटींग दिलेले आहे.

Super Script Sub Script

Caracter View button




**1) Bold …** सिलेक्ट केलेली अक्षरे बोल्ड म्हणजे ठळक होतात.

**2) Italic …** सिलेक्ट केलेल्या अक्षरांना तिरपे वळण येते.

**3) Underline :-** सिलेक्ट केलेल्या अक्षरांना अंडरलाईन येते.

**4) Reverse :-** जर काळे बॅकराउंड असेल तर अक्षरांचा रंग पांढरा होतो.

**5) Streakthough :-** सिलेक्ट केलेल्या अक्षरांना काट मारल्यासारखी एक लाईन येते.

**6) Lower Position :-** सिलेक्ट केलेली अक्षरे कॅपीटल होतात. पण ती थोडी खालील बाजूला असतात.

**7) Upper Postion :-** सिलेक्ट केलेली अक्षरे कॅपीटल होतात. पण ती थेडी वरील बाजूला असतात.

**8) Super Script :-** सिलेक्ट केलेली अक्षरे वरील बाजुला सरकतात.

**9) Sub Script :-** सिलेक्ट केलेली अक्षरे थेडी खलील बाजूला सरकतात.

**10) Font Size :-** सिलेक्ट केलेल्या अक्षरांचा आकार बदलवता येतो.

**11) Leading :-** येथुन दोन लाईनीती अंतर कमी जासत करता येते.

**12) Expert Tracking :-** येथे अक्षरांमधील अंतर कमी जास्त करण्यासाठी पाच पर्याय दिलेले आहे. Very Loose या पर्यायाने अक्षरांतील अंतर वाढते, तर Very Tight या पर्यायाने अक्षरातील अंतर खुप कमी होते.

**13) Horizantal Scale :-** सिलेक्ट केलेल्या अक्षरांची रुदी कमी जास्त करण्यासाठी हा पर्याय वापरतात. एखादी जाहिरात किंवा जॉब जर ठराविक जागेतच बसवायचा असेल तर हा पर्याय वापरतात.

**14) Kerning :-** हेडिंगग साठी अक्षरातील अंतर कमी जास्त करण्यासाठी हा ऑप्शन वापरतात.

**15) Base Line Shift :-** सिलेक्ट केलेली अक्षरे किंवा लाईन बेसलाईनपासुन खाली किंवा वर सरकविता येतात.

**b) Paragraph View :-** पॅरेग्राफसाठी लागणारे सर्व ऑप्शन्स या व्हु मध्ये आहेत.




**1) Left Alignment :-** हि Alignment default असते. सिलेक्ट केलेला पॅराग्राफ डावीकडे येतो.

**2) Right Alignment :-** सिलेक्ट केलेला पॅराग्राफ पानाच्या उजविकडे येतो.

**3) Center Alignment :-** सिलेक्ट केलेला पॅराग्राफ पानाच्या मध्यभागी येतो.

**4) Justify :-** सिलेक्ट केलेला पॅराग्राफच्या सर्व लाईन्स उजव्या बाजुला एका रेषेत आणल्या जातात. पण शेवटची लाईन खुप छोटी असेल तर ती Justify केली जात नाही.

**5) Force Justify :-** या ऑप्शनव्दारे सिलेक्ट केलेल्या सर्व लाईन्स उजव्या बाजुला आणल्या जातात जरी शेवटची लाईन छोटी असेल तरी.

**6) Paragraph Style :-** पॅराग्राफसाठी वेगवेगळया प्रॉप्रर्टी असलेल्या स्टाईल्स अगोरच येथे सेट करुन ठेवलेल्या आहेत. यातील हवी ती स्टाईल सिलेक्ट करुन ती अॅप्लाय करता यते.

**7) Cursor Position Indicator :-** येथे कर्सरचे उजव्या बाजुपासुनचे अंतर दिसते.

**8) First Indent Option :-** पॅराग्राफची पहिली ओळ डाव्या बाजुपासुन किती अंतरावर हवी आहे ते येथे सेट करता येते.

**9) Left Indent :-** संपुर्ण पॅराग्राफ हा डाव्या बाजुला येथे सेट केलेल्या अंतराने सरकतो.

**10) Right Indent :-** पॅराग्राफच्या उजव्या बाजुला रिकामी जागा सोडायची असेल तर याचा उपयोग होतो.

**11) Space Before :-** येथे सिलेक्ट केलेल्या किंवा कर्सर असलेल्या पॅराग्राफ आणि त्याच्या वर असलेला पॅराग्राफ यातील अंतर वाढवता येते.

**12) Space After :-** येथे सिलेक्ट केलेल्या किंवा कर्सर असलेल्या पॅराग्राफ आणि त्याच्या खाली असलेला पॅराग्राफ यातील अंतर वाढवता येते.

**c) Object View :-** येथे ऑब्जेक्ट साठीचे ऑप्शन्स असतात.




**1) Reference Point :-** येथे असलेल्या चौकानावर प्रत्येक कॉर्नर आणि मध्यभागी लहान चौकोन असतो. यातील एखादा चौकोन सिलेक्ट करुन ऑब्जेक्टच्या प्रापर्टी बदलवल्यास होणारे बदल हे या पॉइंटच्या अनुषंगाने होतात.

**2) X-Position :-** ऑब्जेक्टचे डावीकडूनचे अंतर सेट करता येते.

**3) Y- Position :-** ऑब्जेक्चे वरुन अंतर सेट करता येते.

**4) Width :-** येथे सिलेक्ट केलेल्या ऑब्जेक्टची लांबी ठरवता येते.

**5) Height :-** येथे सिलेक्ट केलेल्या ऑब्जेक्टची उंची ठरवता येते.

**6) Rotate :-** सिलेक्ट केलेला ऑब्जेक्ट एका कोनात फिरवता येतो.

**7) Skew :-** येथुन सिलेक्ट केलेल्या ऑब्जेक्टच्या लाईन्स कोनात तिरप्या करता येतात.

**9) Flip Horizantal :-** सिलेक्ट केलेला ऑब्जेब्ट आडवा पलटवण्यासाठी या ऑप्शनचा उपयोग होतो.

**10) Flip Vertical :-** सिलेक्ट केलेला ऑब्जेब्ट उभा पलटवण्यासाठी या ऑप्शनचा उपयोग होतो.

## File Menu

**1) New :-** पेजमेकर मध्ये नविन फाईल तयार करण्यासाठी या कमांडचा उपयोग हातो. या कमांडला क्लिक केल्यावर पुढील प्रमाणे विंडो ओपन होते.

**a) Page Size :-** येथे स्टॅण्डर्ड पेपरची साईज सिलेक्ट करता येते. सिलेक्ट केलेल्या पेपरची लांबी आणि रुंदी खालील बाजुला असलेल्या Dimensions मध्ये दिसते. Custom हा ऑप्शन सिलेक्ट करुन आपण manually पेपर साईज देऊ शकतो.




**b) Orientation :-** पेज ऊभे किवा आडवे हवे हे ठरविण्यासाठी येथे Tall आणि Wide हे दोन ऑप्शन आहेत.

**c) Option :-**

i) Double Sided- पानाच्या दोन्ही बाजु हव्या असतील तर हो चेक बॉक्स सिलेक्ट करावा. पेजमेकरमध्ये पुढील बाजुला Right Side आणि मागील बाजुला Left Side असे म्हणतात.

ii) Facint Pages- वरील Double sided हा पर्याय निवडलेला असेल तरच हा ॲक्टीव्ह होतो. सक्रीनवर Left व Right असे दोन्ही पेजेस एकाच वेळी बघायचे असतील तर हा चेक बॉक्स ऑन ठेवावा.

iii) Number of Pages :- तयार करीत असलेल्या फाईलमध्ये किती पेजेस हवे आहे ते येथुन ठरविता येते.

iv) Restrart Page Number – फाईलमधील पेजेसनां Strart Page समोर दिलेल्या नंबर च्य पुढील नंबर्स येतात.

v) Margin :- येथे पेजच्या चारही बाजूला मार्जीन्स सेट करता येतात. जर Double sided हा पर्याय निवडलेला असेल तर येथे Inside आणि Outside हे ऑप्शन्स दिसतात.

**d) Numbers :-** येथे पेज नंबरचा फारमॅट ठरविता येतो.

**2) Open :-** या कमांडने फाईल्स ओपन करता येतात.

**3) Recent Publication :-** येथे एका लीस्ट मध्ये अगोदर ओपन केलेल्या फाईल्सची लिक्स्ट दिसते. यातील हव्या त्या फाईलवर क्लिक करुन ती ओपन करता येते.

**4) Close :-** या कमांडवर क्लिक केले असता फाईल बंद होते.

**5) Save :-** या कमांडने फाईल सेव्ह करता येते.

**6) Save As :-** या कमांडने अगोदर तयार केलेली फाईल दुस-या नावाने सेव्ह करता येते.

**7) Revert :-** जर आपण ओपन केलेल्या फाईलमधील केलेले बदल रदद करावयाचे असेतील तर या कमांडला क्लिक करावे. या कमांडला क्लिक केल्यावर आपण फाईल जशी ओपन केलेली असेल तशीच्या तशी दिसते.

**8) Place :-** या कमांडने इतर पॅकेजमधील फाईल्स आपल्या ओपन असलेल्या फाईलमध्ये टाकता येतात.

**9) Document Setup :-** या कमांडला क्लिक केल्यास स्क्रीनवर Page setup चा डायलॉग बॉक्स येतो.

**10) Print :-** पेज प्रिंट करण्यासाठी या कमांडचा उपयोग होतो.

## Edit Menu

**1) Undo :-** फाईलमध्ये केले बदल लगेच रदद करण्यासाठी या कमांडला क्लिक करावे.

**2) Copy - Paste :-** सिलेक्ट केलेला मॅटर किंवा ऑब्जेक्ट एका ठिकाणून कॉपी करुन दुस-या ठिकाणी पेस्ट करण्यासाठी या कमांडचा वापर होतो.

**3) Cut - Paste :-** सिलेक्ट केलेला मॅटर किंवा ऑब्जेक्ट एका ठिकाणून कट करुन दुस-या ठिकाणी पेस्ट करण्यासाठी या कमांडचा वापर होतो.

**4) Clear :-** या कमांडने सिलेक्ट केले मॅटर किंवा ऑब्जेक्ट डिलीट करता येते.

**5) Select All :-** पॉइंटर टूल सिलेक्ट करुन संपुर्ण पेज सिलेक्ट करता येते.

**6) Deselect All :-** या कमांडने सर्व सिलेक्शन निघून जाते.

**7) Paste Multiple :-** एखादया ऑब्जेक्टच्या अनेक प्रती तयार करण्यासाठी या कमांडचा उपयोग होतो.

*<u>Procedure :-</u>*

- प्रथम तो ऑब्जेक्ट सिलेक्ट करावा.
- Copy किंवा Cut या कमांडला क्लिक करावे.
- नंतर Paste Multiple या कमांडला क्लिक करावे.
- येथे डायलॉग बॉक्समधील Paste समोर किती प्रती हव्या आहेत, तसेच AmS>do d Cämo A§Va ho Horizantal d Vertical Offset `oÏmwZ XoVm `oVo.
- शेवटी Ok या बटनावर क्लिक करावे.

**8) Object :-** वेगवेगळी ऑब्जेक्टस पेजमध्ये टाकण्यासाठी या कमांडचा उपयोग होतो. या कमांडला क्लिक केल्यास स्क्रीनवर एक डायलॉग बॉक्स येतो, यात पुढील दोन tab असतात.

Create New -

- यात Object Type ची लिस्ट असते.
- यातील हव्या त्या पॅकेजला क्लीक करुन Ok बटनावर क्लिक केल्यास तो प्रोग्रॅम सुरु होतो.
- या हवे असलेले काम करुन या प्रोग्रॅमची विंडो बंद करावी.

Create From File :-

आधिच तयार केलेला एखादा ऑब्जेक्ट फाईल मध्ये येथुन टाकता येतो.

**<u>Adobe Table</u> :-**

Object या कमांडला क्लिक केल्यास यातील यादीत Adobe Table हा एक पर्याय दिसतो. पेजमेकरमध्ये टेबल तयार करण्यासाठी या कमांडचा उपयोग होतो. येथे खालील ऑप्शन्स असतात.

Layout - टेबलमध्ये किती Rows आणि Columns हवे ते येथे दयावे.

Table Size - टेबलाची लांबी आणि रुंदी येथुन ठरवता येते.




Table Gutters – येथुन दोन रो आणि कॉलमधील अंतर ठरवता येते.

शेवटी Ok बटनावर क्लिक करावे.

**9) Edit Story :-** जर आपल्याला फाईलमधील टेक्स्ट मॅटरवर Find, Replace किंवा Spelling check यासारखी कामे करावयाची असतील तर या कमांडचा वापर होतो. यासाठी प्रथम selet tool ने त्या अक्षरांचे हॅंगर सिलेक्ट करावे. नंतर या कमांडला क्लिक करावे.

## Layout Menu

या मेनुमध्ये पेजसंबंधी खालील कमांडस आहेत.

**1) Go to Page :-** जर फाईलमध्ये जास्त पेजेस असतील आणि आपणांस एखादया पानावर जायचे असेल तर या कमांडचा उपयोग होतो.

*Procedure :-*

➢ Goto Page या कमांडला क्लिक करावे.

- यातील डायलॉग बॉक्स समोरील Goto Page समोर ज्या पान नंबरवज जायचे असेल तो नंबर दयावा.
- नंतर Ok बटनावर क्लिक करावे.

**2) Insert Pages :-** फाईमध्ये पेजेस वाढविण्यासाठी कमांडचा वापर होतो.

*Procedure :-*

- या कमांडला क्लिक करावे.
- Insert या नावासमोर किती पेजेस हवे आहेत ते दयावे.
- जर हि नविन पेजेस चालु पेजच्या आधी हवी असतील तर Pages समोरुन Before हा ऑप्शन सिलेक्ट करावा आणि जर पेजच्या नंतर हवे असतील तर After हा ऑप्शन सिलेक्ट करावा.
- शवेटी Ok या बटनावर क्लिक करावे.

**3) Remove Pages :-** फाईलमधील पेजस डिलीट करण्यासाठी या कमांडचा उपयोग होतो.

*Procedure :-*

- या कमांडला क्लिक करावे.
- Remove Pages मध्ये ज्या पेजपासुन सुरवात करावयाची आहे तो पेजनंबर दयावा.
- Through मध्ये शेवटचा पेज नंबर दयावा.
- Ok वर क्लिक करावे.

  E.g. – जर आपल्या फाईमध्ये 10 पेज असतील आणि आपल्याला त्यातील 4 ते 7 पेज काढावयाची असतील तर Remove Pages समोर 4 नंबर दयावा आणि Through समोर 7 नंबर दयावा. जर एकच पेज काढावयाचे असेल तर दोन्ही ठिकाणी तोच नंबर दयावा.

**4) Go Back :-** या कमांडने फाईलमधील चालु पानाच्या आधिचे पेज दिसते.

**5) Go Forward :-** फाईमधील चालु पेजच्या पुढील पेज बघण्यासाठी या कमांडला क्लिक करावे.

**6) Column Guides :-** न्युज पेपर मधील मॅटर ज्या पदधतीने कॉलममध्ये रचलेले असते तसे जर मॅटर कॉलममध्ये टाईप करावयाचे असेल तर या कमांडचा उपयोग हातो.

*Procedure :-*

- या कमांडला क्लिक कराव
- Number of Columns येथे जेवढे कॉलम हवे असतील तो नंबर दयावा.
- Space between Columns दाने कॉमलमधील अंतर येथुन ठरवता येत

- Adjust Layout जर आपण मॅटर आधिच टाईप करुन ठेवला असेल तर तो सिलेक्ट करुन हा ऑप्शन सिलक्ट करावा.
- नंतर ok या कमांडला क्लिक करावे.

**7) AutoFlow :-** एखादी फाईल प्लेस करतांना किंवा Edit Story मधील फाईल प्लेस करतांना जर हा पर्याय निवडलेला असेल तर जास्तीचे मॅटर पुढील पानावर आपोआप ठेवले जाते.

*Procedure :-*

- आधि Auto हा ऑप्शन सिलेक्ट करावा.
- नंतर फाईल Place या ऑप्शने निवडावी.
- आता माऊस पॉइंटर Curved Down Arrow च्या स्वरुपात आलेला दिसेल.
- जेथे फाईल ठेवायची असेल तेथे माऊसने क्लिक करावे.
- जर फाईलमधील मॅटर खुप जास्त असेल आणि तो एकाच पानावर बसत नसेल तर तो मॅटर आपोआप पुढील पानावर टाकला जातो. यासाठी पुढील पानेसुध्दा आपोआप घेतली जातात.

## Type Menu

अक्षरांसाठी विविध फॉरमॅटींग कमांडस येथे आहेत. यातील Font Size, Leading, Type Style, Reverse, Expert Kerning, Expert Tracking, Horizantal Scale या कमांडस आपण आधिच Control Pallete मधील Character View मध्ये बघितलेल्या आहेत.

**1) Character :-** येथे फान्टच्या वरील सर्व प्रापर्टी दिसतात.

**2) Paragraph :-** येथे पुढील ऑप्शन दिसतात.




**a) Indents :-**

i) Left – पॅराग्राफचे डावीकडून अंतर सेट करता येते.

ii) First – पॅराग्राफच्या फक्त पहिल्या लाईनचे डावीकडून अंतर सेट करता येते.

iii) Right – पॅराग्राफचे उजवीकडून अंतर सेट करता येते.

**b) Paragraph Space :-** येथे Before आणि After या ऑप्शनव्दारे पॅराग्राफच्या वर आणि खाली अंतर सोडता येते.

**c) Alignment :-** येथे पॅराग्राफची Left, Right, Center किंवा Justify अशी Alignment ठरविता येते..

**d) Options :-.**

**i) Keep lines together :-** पेजच्या खालील भागातील पॅराग्राफ ब-याचदा दोन पानांत विभागला जातो, अशा वेळी तो जर एकाच पेजवर राहु दयावयाचा असेल तर हा ऑप्शन सिलेक्ट करावा.

**ii) Column break before :-** हा ऑप्शन सिलेक्ट केला तर एका कॉलमधील पॅराग्राफ जर दस-या कॉलममध्ये जात असेल तर तो तोडला जाऊन पुढील कॉमल मध्ये जातो.

**iii) Page break before :-** एका कॉलम मधील पॅराग्राफ जर दुस-या कॉलमध्ये जात असेल आणि तो जर पुढील पानावर हवा असेल तर हा ऑप्शन सिलेक्ट करावा.

**iv) keep with next –** येथे दिलेल्या लाईन्स मागील पानावर राहतात.

**v)Windows Control :-** काही वेहा पॅराग्राफच्या पहिल्या काही लाईन्स कॉमलच्या किंवा पॅराग्राफच्या शेवटी जातात व इतर लाईन्स पुढील कॉमल किंवा पानावर येतात यालाच विंडोज कंन्ट्रोल असे म्हणतात. जर या लाईन्स पुढील पानावर किंवा कॉलम मध्ये टाकावयाच्या असतील तर त्या पॅराग्राफच्या किती लाईन्स पुढील पानावर हव्या After आहेत तो नबंर येथे दयावा. येथे फक्त 1,2 किंवा 3 हेच नंबर देता येतात.

**vi) Orphan Control :-** काही वेळा पॅराग्राफच्या शेवटची ओळ पुढील कॉलमध्ये किंवा पानावर आलेलल्या असतील आणि जर जर आपल्याला या ओळीसोबत मागील पानावरील दोन किंवा तीन ओळी या ओळीसोबत टाकावयाच्या असतील तर येथे 2 किंवा 3 नंबर दयावा.

**3) Indents and Tabs :-** यातील आप्शनव्दारे अक्षरांची जागा निश्चित केली जाते. Indents हे अक्षरांना डावीकडून आणि उजविकडूनआतमध्ये सरकवितात, तर Tab हे अक्षरांना एका ठराविक ठिकाणी आणतांत. Keyboard वरील Tab कि प्रेस केली असता कर्सर ज्या विशिष्ट अंतरावर जाऊन थांबतो, त्याला tab stop म्हणतात. या कमांडला क्लिक केल्यास पुढील प्रामणे एक डॉयलॉग बॉक्स ओपन होतो.




येथे वरील डाव्या कोप-यात चार बाण दिसतात. यांना टूब टाईप असे म्हणतात. तसेच खालील बाजुला एक रुलर लाईन दिसते. जेवढया अंतरावर टूब सेट करावयाचा असेल तेवढया अंतरावर या रुलर लाईनवर क्लिक करावे. तसेच आणखी पुढे टॅब हवे असतील तर पुढील अंतरावर क्लिक करावे.